**D**

# जिल्हा परिषद अहमदनगर

## परिचर गट - 'ड' अनुशेष भरती परीक्षा -२०११

दिनांक १३/११/२०११ वेळ दु.२.०० ते ३.३०

१. एकूण ७५ प्रश्न असून सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.
२. प्रत्येक प्रश्नाला चार पर्याय दिलेले आहेत.त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर पत्रिकेवरील सूचनेप्रमाणे भरावा.
३. मोबाईल, कॅल्क्युलेटर,पेजर,संगणक व तत्सम इलेक्ट्रॉनिक्स वस्तू वापरास बंदी आहे.
४. उत्तराच्या योग्य क्रमांकावर भरीव गोल करण्यासाठी फ़क्त काळ्या शाईच्या बॉलपेनचा वापर करावा.

प्रश्न क्रमांक -१ ५४६०७- ३५४२८ = किती ?
१) ११९७९ २)१९१८९ ३) ९००३५ ४)२९१८९

प्रश्न क्रमांक -२ सात लक्ष सात ही संख्या अंकात कशी लिहाल ?
१)७०००७ २)७००००७ ३)७०००००० ४)०७०७०००७

प्रश्न क्रमांक -३ पृथ्वीच्या स्वतः भोवती फ़िरण्याच्या गतीला काय म्हणतात ?
१) वार्षिक गती २) दैनिक गती ३) मासिकगती ४) स्वगती

प्रश्न क्रमांक -४ -----------महाराष्ट्राची उपराजधानी आहे.
१) मुंबई २) पूणे ३)औरंगाबाद ४) नागपूर

प्रश्न क्रमांक -५ खालीलपैकी कोणती नदी तापी नदीची उपनदी नाही.
१)पूर्णा २) गिरणा ३)पांझरा ४) दुधना

प्रश्न क्रमांक - ६ सांध्याचे मुख्यतः किती प्रकारे वर्गीकरण करता येते ?
१)२ २)४ ३)८ ४)६

प्रश्न क्रमांक -७ सरपंचाची निवड कोण करते ?
१) गट विकास अधिकारी २) ग्रामपंचायत सदस्य ३) ग्राम शिक्षण समिती ४) ग्रामसभा

प्रश्न क्रमांक -८ महानगरपालिकेचे अध्यक्ष कोण ?
१) आयुक्त २) नगराध्यक्ष ३) महापौर ४) मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रश्न क्रमांक -९ सह्याद्री पर्वतातील महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कोणते ?
१) हरिश्चंद्र गड २) तोरणमाळ ३) रतनगड ४) कळसूबाई

प्रश्न क्रमांक -१० अहमदनगर जिल्ह्याच्या सीमेलगतचे जिल्हे किती ?
१)४ २) ५ ३)६ ४)७

प्रश्न क्रमांक -११ -------- या पदार्थाचा उपयोग खतनिर्मितीच्या कामात होतो .
१) नॅप्था २)ॲल्युमिनियम ३) डिझेल ४) डांबर

प्रश्न क्रमांक -१२ कोणत्या संघराज्याचे क्षेत्र आपल्या राज्याच्या सर्वात जवळ आहे ?
१) गोवा २) दादरा हवेली. ३)लक्षद्विप ४) दीव दमन

प्रश्न क्रमांक -१३ 'कोरकू' या आदिवासी जमातीचे वास्तव्य कोठे आहे ?
१) चंद्रपूर २) अमरावती ३) ठाणे ४) नांदेड

प्रश्न क्रमांक -१४ -------- हा महाराष्ट्राचा राज्यपक्षी आहे.
१) मोर २) हरीयाल ३) पोपट ४) गरुड

प्रश्न क्रमांक -१५ स्टेनलेस स्टील मध्ये ------,निकेल आणि लोखंड हे धातू असतात.
१) क्रोमीअम २) ॲल्युमिनियम ३) तांबे ४) नस्त

प्रश्न क्रमांक -१६ ॲल्युमिनियम निर्मितीसाठी कोणत्या खनिजाचा उपयोग करतात ?
१) मॅगनिज २) बॉक्साईट ३) क्रोमाईट ४) डोलोमाईट

प्रश्न क्रमांक -१७ महाराष्ट्रात अणुविद्युत केंद्र कोठे आहे ?
१) तारकपूर २) मुंबई हाय ३) जैतापूर ४) तारापूर

प्रश्न क्रमांक -१८ सध्या महाराष्ट्राचे राज्यपाल कोण आहेत ?
१) पृथ्वीराज चव्हाण २) एस.जी.जमीर ३) के.शंकरनारायण ४) यापैकी नाही.

प्रश्न क्रमांक -१९ खालील पैकी मुंबई येथे कोणते पर्यटन स्थळ नाही ?
१)इंडीया गेट २) गेट वे ऑफ़ इंडीया ३) नेहरु विज्ञान केंद्र ४) जहांगीर आर्ट गॅलरी

प्रश्न क्रमांक -२० ११/११/२०११ हा दिवस संपूर्ण देशभर काय म्हणून साजरा करण्यात आला ?

१) लोकसंख्या दिन　२) शिक्षण दिन　३) शिक्षक दिन　४) वसुंधरा दिन

प्रश्न क्रमांक -२१ नविन धोरणानूसार शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महीलांसाठी किती टक्के सदस्यत्व राखुन ठेवले आहे ?

१) ३३ टक्के　२) ३० टक्के　३) ५० टक्के　४) ७५ टक्के

प्रश्न क्रमांक -२२ खालीलपैकी कोणते कर्मचारी ग्रामस्तरावरील कर्मचारी नाही.?

१) पोलीस पाटील　२) ग्रामसेवक　३) आरोग्य सेवक　४) सरपंच

प्रश्न क्रमांक -२३ क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्वात लहांन जिल्हा कोणता ?

१)अहमदनगर　२) हिंगोली　३) वाशिम　४) मुंबई शहर

प्रश्न क्रमांक - २४ महाराष्ट्र राज्याला किती लांबीचा सागर किनारा लाभला आहे ?

१) ११२० कि.मी.　२) ७२० मीटर　३)७२० कि.मी.　४) यापैकी नाही.

प्रश्न क्रमांक -२५ केंद्र सरकारचा माहिती अधिकार कायदा कोणत्या वर्षी लागु करण्यात आला ?

१)२००५　२) २००२　३) २०१०　४) २००८

प्रश्न क्रमांक -२६ पंचायती राज पध्दतीचा स्विकार करणारे पहीले राज्य कोणते ?

१) राजस्थान　२) आंध्रप्रदेश　३) महाराष्ट्र　४) गुजरात

प्रश्न क्रमांक -२७ महाराष्ट्रातील पहीले कृषी विद्यापीठ कोणते ?

१) कोकण कृषी विद्यापीठ　२) पंजाबराव कृषी विद्यापीठ　३) महात्मा फुले कृषी विद्यापीठ　४) पुणे विद्यापीठ

प्रश्न क्रमांक -२८ खालील शब्द गटातील एकवचनी शब्द ओळखा.

१) घोडे　२) वाडे　३)गाणे　४)गावे

प्रश्न क्रमांक -२९ खालील शब्द गटातील अनेकवचनी शब्द ओळखा.

१)चटई　२) समई　३) सोई　४) बाई

प्रश्न क्रमांक -३० "आभाळ फाटणे" या वाकप्रचाराचा योग्य अर्थ सांगा .

१) आभाळ फाटून जाणे.　२) जास्त पाऊस पडणे.　३) सर्व बाजूंनी संकटे येणे.　४) आभाळातून आवाज येणे.

प्रश्न क्रमांक -३१ वयाने जेष्ठ असणा-या व्यक्तींना पत्र लिहितांना कोणता मायना वापरतात ?

१)तीर्थरुप　२) प्रिय　३) श्री.रा.रा.　४) माननीय.

प्रश्न क्रमांक - ३२ अब्राहम लिंकन ------------------ राष्ट्राध्यक्ष होते.

१) इंग्लडचे　२)अमेरीकेचे　३) अफ्रिकेचे　४) सोळावे

प्रश्न क्रमांक - ३३ खालील पैकी शुदध शब्द कोणता .

१) आशीर्वाद　२) आर्शिवाद　३) आर्शीर्वाद　४) आशिर्वाद

प्रश्न क्रमांक -३४ खाली "अ" गटामध्ये विशेषणे व "ब" गटामध्ये नामे दिलेली आहे.त्यांच्या योग्य जोड्यांचा पर्याय कोणता.

| "अ" गट | "ब" गट |
|---|---|
| १) मंद | अ) वाडा |
| २)पडका | ब) झुळूक |
| ३)पाचूचे | क) नदी |
| ४) निळी | ड) शेत |

१) १-अ,२-क,३-ड,४-ब　२)१-ब,२-अ,३-क,४-ड　३)१-ब,२-अ,३-ड,४-क　४) १-अ,२-ब,३-ड,४-क

प्रश्न क्रमांक -३५ 'स्वैर' या शब्दाचा विरुध्द अर्थी शब्द ओळखा

१) सुंदर　२)स्वतंत्र　३) बंधन　४) यापैकी नाही.

प्रश्न क्रमांक -३६ पुढील वाक्याचा प्रकार ओळखा .- "हो तर,अगदी बरोबर ,एकशे दहा मोहरा होत्या."

१) उदगारार्थी　२)प्रश्नार्थक　३) नकारार्थी　४) यापैकी नाही.

प्रश्न क्रमांक -३७ पुढे दिलेल्या प्रसंगास अनुरुप योग्य ती म्हण निवडा - 'आत्ताच शाळेत नव्याने प्रवेश घेतलेली वंदना सर्व शिक्षकांची आवडती विद्यार्थिनी झाली.'

१)अति तेथे माती　२) प्रयत्नांती परमेश्वर　३) काना मागुन आली नि तिखट झाली.　४) नाका पेक्षा मोती जड.

प्रश्न क्रमांक -३८ 'पुन्यांदा' या ग्रामीण शब्दासाठी मराठी प्रमाणभाषेतील योग्य शब्द कोणता.
१) पुण्याला २)पुना ३)पुन्हा ४) यांना देणे.

प्रश्न क्रमांक -३९ 'बेसावध' या शब्दात लपलेले शब्द कोणते ?
१) सावध २) वध ३)साव ४) वरील सर्व

प्रश्न क्रमांक - ४० कोकण कशासाठी सर्वात जास्त प्रसिध्द आहे ?
१) संत्री २) काजू ३) केळी ४) सफ़रचंद

प्रश्न क्रमांक -४१ -------साली भारताने आपला राष्ट्रीय पक्षी म्हणून मोराला मानाचे स्थान मिळवून दिले
१) १९६२ २)१९७० ३)१९५० ४)१९४७

प्रश्न क्रमांक -४२ महाराष्ट्रात बीड जिल्ह्यात ----------येथे मयूर अभयारण्य आहे.
१) पाटोदा. २) गेवराई. ३) नायगाव. ४) परळी.

प्रश्न क्रमांक -४३ थोर क्रांतिकारक भगतसिंह ---------- नावाच्या साप्ताहिकात बलवंतसिंह या नावाने काम करीत होते.
१)प्रताप २) सत्यवादी ३)ध्येयवादी ४) इन्किलाब.

प्रश्न क्रमांक -४४ अजिंठा लेणी मध्ये कोरलेल्या चित्रांचे विषय कोणते
१) बुध्द आणि त्यांचा धर्म २)भागवत धर्म कथा ३) जैन धर्म ४) दंत कथा

प्रश्न क्रमांक -४५ 'तळ' या शब्दांचा समानार्थी शब्द कोणता ?
१) प्रस्थान २) विमान ३) वाहन ४) स्थान.

प्रश्न क्रमांक -४६ डॉ. सी.व्ही. रमण यांना कोणता पुरस्कार मिळाला होता. ?
१)रॅमन मॅगससे २) भारतरत्न ३)नोबेल ४) बुकर

प्रश्न क्रमांक -४७ 'या भारतात बंधुभाव नित्य वसू दे' हे गाणे -------- यांनी लिहीले आहे.
१) संत गाडगे महाराज २) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ३) साने गुरुजी ४) संत तुकाराम महाराज

प्रश्न क्रमांक -४८ जसे गायीचे - वासरू तसे म्हशीचे - --------
१)करडू २) रेडकू ३) शिंगरू ४)पिल्लू

प्रश्न क्रमांक -४९ २३ मार्च १९३१ रोजी कोणत्या देशभक्तास फ़ाशी देण्यात आली नाही.?
१) भगतसिंह २)चंद्रशेखर आझाद ३) राजगुरु ४) सुखदेव

प्रश्न क्रमांक -५० अजिंठा लेण्यातील एकोणिसाव्या लेण्याचे नाव --------आहे.
१) गंध कुटी २) बुध्द कुटी ३) पर्णकुटी ४) चंद्रकुटी

प्रश्न क्रमांक -५१ पुढील म्हण पूर्ण करण्यासाठी योग्य पर्याय निवडा- ' नळी फुंकिली सोनारे -------
१)कामाला लागु सारे २) इकडून तिकडे गेले वारे ३) घरोघरी मातीच्या चुली ४) यापैकी नाही

प्रश्न क्रमांक -५२ केशवकुमार हे टोपण नाव असणा-या साहित्यिकाचे संपूर्ण नाव कोणते?
१) प्रल्हाद केशव अत्रे २) कृष्णाजी केशव दामले ३)शंकर केशव कानेटकर ४) विष्णु वामन शिरवाडकर

प्रश्न क्रमांक -५३ मैदानावर २२ मुले फ़ुटबॉल व १८ मुले खो-खो खेळत आहेत, आणि १९४ मुले खेळ पाहत आहेत तर एकूण किती मुले खेळत आहेत?
१) २३४ २) २१६ ३) १५४ ४)४०

प्रश्न क्रमांक -५४ $\frac{१३}{१९} + \frac{४}{१९} + \frac{२}{१९}$ = किती ?
१) $\frac{१९}{५७}$ २) $\frac{१५}{१९}$ ३) $\frac{१७}{१९}$ ४) १

प्रश्न क्रमांक -५५ १ जानेवारी २०११ रोजी शनिवार होता तर ३१ डिसेंबर २०१० रोजी कोणता वार असेल ?
१) शनिवार २) रविवार ३) शुक्रवार ४) सोमवार

प्रश्न क्रमांक -५६ ज्या संख्येला भागायचे आहे त्या संख्येला ------म्हणतात.
१)भाजक २) भागाकार ३) भाज्य ४)अविभाज्य

प्रश्न क्रमांक -५७ प्रत्येक भाग $\frac{१}{११}$ आहे असे ५ भाग म्हणजे किती ?
१) $\frac{१५}{११}$ २) $\frac{६}{११}$ ३) $\frac{५}{११}$ ४) $\frac{५}{५५}$

प्रश्न क्रमांक -५८ दिलेल्या अपूर्णांकाच्या चढता क्रम ओळखा.

१) $\frac{८}{१३}, \frac{१२}{१३}, \frac{५}{१३}$ २) $\frac{१२}{१३}, \frac{८}{१३}, \frac{५}{१३}$ ३) $\frac{५}{१३}, \frac{८}{१३}, \frac{१२}{१३}$ ४) $\frac{५}{१३}, \frac{१२}{१३}, \frac{८}{१३}$

प्रश्न क्रमांक -५९ ४,२,०,३ हे अंक एकदाच वापरुन तयार होणारी चार अंकी लहानात लहान संख्या कोणती ?

१) ३४२० २) ३०२४ ३) ०२३४ ४)२०३४

प्रश्न क्रमांक -६० पुढील अपूर्णांपैकी सर्वात लहान अपूर्णांक ओळखा.

१) $\frac{७}{१७}$ २) $\frac{८}{१७}$ ३) $\frac{२}{१७}$ ४) $\frac{५}{१७}$

प्रश्न क्रमांक -६१ प्रत्येक घनाला किती कडा असतात ?

१) चार २) बारा ३) आठ ४) अठ्ठावीस

प्रश्न क्रमांक -६२ ७ से.मी. लांबी व ५ से.मी. रुंदी असलेल्या आयताची परिमिती किती ?

१) १२ से.मी. २) २४ से.मी. ३) ३५ से.मी. ४) ९४ से.मी.

प्रश्न क्रमांक -६३ १५ रुपये ५ पैसे - ४ रुपये २५ पैसे = किती ?

१)११ रु. २५ पैसे २) १९ रु.३० पैसे ३) ११ रु.३० पैसे ४)१० रु.८० पैसे.

प्रश्न क्रमांक -६४ नऊ मुलांना ८७३ रुपये सारखे वाटावयाचे आहेत, तर प्रत्येकाला किती रुपये मिळतील ?

१) ८७ २)७९ ३) ९७ ४)९८

प्रश्न क्रमांक -६५ पुढील वस्तुमानाच्या एककांच्या 'लहानाकडून मोठ्याकडे' याप्रमाणे योग्य क्रम कोणता

१) ग्रॅम,हेक्टोग्रॅम, डेकाग्रॅम, किलोग्रॅम २) हेक्टोग्रॅम,डेकाग्रॅम, ग्रॅम,किलोग्रॅम. ३) ग्रॅम, डेकाग्रॅम, हेक्टोग्रॅम, किलोग्रॅम ४) किलोग्रॅम,हेक्टोग्रॅम, डेकाग्रॅम,ग्रॅम

प्रश्न क्रमांक -६६ १ ते १०० पर्यंत दोन अंकी संख्या किती ?

१)९९ २) ९१ ३) ९० ४) ८९

प्रश्न क्रमांक -६७ $\frac{१}{७}$ मध्ये $\frac{१}{७}$ किती वेळा मिळवावेत म्हणजे उत्तर १ येईल ?

१) ६ २) $\frac{१}{६}$ ३) ७ ४) $\frac{१}{७}$

प्रश्न क्रमांक -६८ वर्तूळावरील कोणत्याही दोन बिंदूंना जोडणा-या रेषाखंडाला ---------म्हणतात.

१) त्रिज्या २) जीवा ३) केंद्र ४) यापैकी नाही.

प्रश्न क्रमांक -६९ भारतीय सौर वर्षातील ३१ दिवस असलेला महिना कोणता ?

१) ऑक्टोबर २) पौष ३)श्रावण ४) जानेवारी

प्रश्न क्रमांक -७० ५ लिटर म्हणजे -------मिलीलिटर होय.

१)५० २)५०० ३)१००० ४)५०००

प्रश्न क्रमांक -७१ ३ किलोग्रॅम म्हणजे -----हेक्टोग्रॅम होय.

१)३००० २)३०० ३) १८० ४) ३०

प्रश्न क्रमांक -७२ विहिरीची खोली मोजण्यासाठी पुढीलपैकी कोणते एकक वापरावे ?

१)ग्रॅम २) मीटर ३)लिटर ४) बांबू

प्रश्न क्रमांक -७३ लांबी मोजण्यासाठी खालीलपैकी कोणते प्रमाणित एकक नाही ?

१) मिली मीटर २) सेंटिमीटर ३)मीटर ४) वित

प्रश्न क्रमांक - ७४ १७ वाजुन २५ मिनिटे म्हणजे दुपारचे किती ?

१) साडे पाच २) ७वाजुन २५ मिनिटे ३) ५ वाजून २५ मिनिटे ४) १२ वाजुन २५ मिनिटे

प्रश्न क्रमांक -७५ पंकजने मध्यान्हपूर्व ७ वाजता शेतात कामाला सुरुवात केली तो मधान्हपूर्व ११ वा.३०मिनिटे पर्यंत काम करत होता ,तर तो किती वेळ काम करीत होता ?

१)१८ तास ३० मिनिटे २)४ तास ३ ०मिनिटे ३) ३ तास ४० मिनिटे ४) यापैकी नाही.